# प्रकरण : दुसरे

# संदर्भ साहित्याचा आढावा

२.१ प्रास्ताविक

२.२ संबंधित साहित्याच्या आढवा

२.३ गत संशोधनाचा आढावा

२.४ समारोप

## २.१ प्रास्ताविक

सामाजिक शास्त्राच्या संशोधनातील प्रत्येक टप्प्यावर उपलब्ध साधनसामग्रीचा परामर्श घेणे अत्यंत आवश्यक असते. त्यामध्ये विषयाशी साधर्म्य असलेले संशोधन व अभ्यास उपयुक्त ठरतो. पूर्वी झालेल्या अभ्यासावरुन अभ्यास विषयाची सर्वांगिण माहिती मिळते आणि नविन संशोधकांना दिशा मिळत असते. (देगावकर श.गो., राजकीय समाजशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००१.) प्रस्तुत अभ्यासासाठी सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेशी निगडीत आणि साधर्म्य असलेल्या विविध अभ्यासाचा, पुस्तक ग्रंथाचा आणि लेखांचा आढावा घेऊन माझे संशोधन इतरांपेक्षा कसे वेगळे आहे याची मांडणी केली आहे. प्रस्तुत संशोधन विषय पूर्ण करताना ब्रिटिशकालीन अन्न–धान्याचा प्रश्न, ब्रिटिशांनी अन्न–धान्य टंचाईवर योजलेले उपाय या सर्व धोरणांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधन विषय हा आवश्यक संदर्भांचा आढावा घेतल्यामूळेच पूर्ण झाला. त्याचबरोबर ब्रिटिशांच्या राजवटीत अन्न–धान्याचा तुटवडा, त्या काळात पडलेले दुष्काळ, अन्न–धान्याची समस्या इत्यादी बाबींचा परामर्श घेतला आहे. ब्रिटिशकालीन अन्नधान्याच्या टंचाईची कारणे व उपाय व सध्याची अन्नधान्य समस्या व त्यावरील उपाय या सर्व घटनांचा आढावा संदर्भ साहित्यामुळे घेता आला. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना भारतातील प्रत्येक राज्यात आहे परंतु या योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी, लाभार्थ्यांची निवड, रेशनधान्य दुकानाचा परवाना, दक्षता समित्यांमधील राजकारण, स्थानिक राजकारणाचा हस्तक्षेप, धान्य वाटपातील घोटाळे, छत्तीसगढ राज्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे यश, ब्राझीलमधील झिरो हंगर योजना अशा अनेक महत्त्वांच्या घटकांचा आढावा संदर्भ साहित्यातून घेता आला. त्याच बरोबर अमर्त्य सेन यांनी दुष्काळाबाबत अनेक विचार मांडले या सर्व घटनांचा आढावा घेतला आहे.

भारतीय राज्यघटनेने लोकशाही शासनव्यवस्थेत लोककल्याणकारी योजनांचा समावेश केला आहे. लोककल्याणकारी योजनांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची सैधान्तिक बाजू संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यामूळेच स्पष्ट करता आली. सार्वजनिक वितरण योजनच्या अंमलबजावणी रॉल्सचा वितरणात्मक न्यायाप्रमाणे झाली तर ही योजना कल्याणकारी राज्याची निर्मिती करेल. संशोधन विषयाची सैधान्तिक चौकट संदर्भ साहित्याचा आढावा घेतला आहे. प्रस्तुत संशोधन विषयाच्या अर्थपूर्ण मांडणीसाठी उपयोग

झाला असून त्या अनुषंगाने घेतलेला संदर्भ साहित्याचा आढावा प्रस्तुत संशोधन विषयाची पायाभरणी ठरली आहे.

### २.२ संबंधित साहित्याच्या आढवा

१. Nadkarni M.V. Agricultural Prices and Development with Stability, National Publishing House , New Delhi , 1973. भारतातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेशी संबंधित सर्व आकडेवारीचे विश्लेषण या संदर्भात दिलेले आहे. भारतात १९६१ मध्ये फक्त ४७.८ हजार स्वस्तधान्य दुकाने होती त्यांची वाढ होवून १९६९ मध्ये १.३५ लाख इतकी झाली कारण या काळात दोन मोठे दुष्काळ भारतात पडले होते. अन्न–धान्याची गरज सर्वसामान्य जनतेला असल्यामुळे वितरण व्यवस्था सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे असे निरीक्षण या संदर्भात नोंदवले आहे. १९६१ मध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या सहकार्यातून ३.९८ दशलक्ष टन १९६३ मध्ये ८.६६ दशलक्ष टन १९६४ मध्ये ८.६६ दशलक्ष टन, १९६५ मध्ये १०.०८ दशलक्ष टन, १९६६ मध्ये १४.०८ दशलक्ष टन धान्य शाशकिय गोदामात धान्य विक्रीसाठी उपलब्ध होते. या आकडेवारीवरुन असे स्पष्ट हाते की, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून धान्याचे वितरणाचे प्रमाण वाढत गेले. १९६६ मध्ये २४१ दशलक्ष लोक व १९६७ मध्ये २७६ दशलक्ष लोक सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा लाभ घेत होते. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजेनेतील लाभार्थ्यांचे प्रमाण वाढत गेले हे या आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे. भारतातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही सर्वसामान्य लोकांसाठी गरजेची आहे त्यामुळे या योजनेत योग्य लाभार्थ्यांना सहभागी करुन घेणे आवश्यक आहे असे निरीक्षण या संदर्भात नोंदवले आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य विरतण योजनेच्या वाढत्या प्रभावाचा अभ्यास व या योजनेची सैधान्तिक पार्श्वभूमी अभ्यासताना या संदर्भाचा उपयोग करण्यात आला आहे.

२. Radhakrishna R. and Indrakanta S. Effects of Intervention Policies in India: The case study of Andhra Pradesh, CESS ,Memeographed, Hydrabad, 1987. भारतातील ग्रामीण व शहरी भागातील अन्न–धान्याच्या धोरणाबाबतच्या काही शिफारशी या संदर्भात सुचविण्यात आल्या आहेत. त्या शिफारशींचा अभ्यास हा प्रस्तुत संशोधन विषयासाठी करण्यात आला आहे. त्यामधील

काही प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत. तांदूळ व गव्हाचे उत्पादन जास्त होत असलेल्या राज्यांमधून या धान्यांची खरेदी करुन गरज असलेल्या राज्यांमध्ये या धान्याचा पुरवठा शासनाने करायला पाहिजे.

१. धान्याची खरेदी व विक्री संदर्भातील असलेले कडक निर्बंध शासनाकडून काढून टाकण्यात यावेत.

२. प्रत्येक व्यक्तीचे आर्थिक स्वावलंबन होण्यासाठी त्या व्यक्तीच्या कुटुंबाला गरजेपुरता धान्याचा पुरवठा शासनाने करावा.

३. मागणी असलेले धान्य एफसीआय कडून हिरव्या कार्डच्या माध्यमातून खरेदी करावे. त्या धान्याचे वितरण हे २ रुपये किलो प्रमाणे मध्यम वर्गीय लोकांना करावे.

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना सामान्य लाभार्थ्यांसाठी गरजेची आहे. शासनाने धान्य वितरणासाठी विविध धोरणे तयार केली होती. अन्न–धान्याचा पुरवठा आवश्यक राज्यांना करण्यासाठी जास्त उत्पादन होत असलेल्या राज्यांची मदत घेण्यात आली. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेमध्ये अन्न–धान्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. शासनाच्या या धोरणांचा आढावा घेण्यासाठी या संदर्भ ग्रंथाचा अभ्यास करण्यात आला आहे.

३. Sarma J. S., Administeder Prices of Foodgrains in India , in Agricultural Price Policy for Developing Countries J.W. Mellor and Raisuddin Ahmed, 1987. भारतामध्ये १९८१ च्या अखेरीस ६६० दशलक्ष व्यक्ती या रेशन धान्य दुकानातील धान्य खरेदी करत होत्या. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या माध्यमातून सवलतीच्या दरात धान्याचे वितरण होत असल्यामुळे लोकांना या योजनेची आवश्यकता होती असा विचार प्रस्तुत संदर्भात मांडला आहे. धान्याची खरेदी किंमत, विक्री किंमत, धान्याच्या सवलतीच्या किंमतीचे धोरण, धान्याची उपलब्धता, धान्याचा तुटवडा, या सर्व संकल्पनांचे विश्लेषण या संदर्भामध्ये आहे.

देशातील लोकसंख्या व त्या लोकांची धान्याची गरज पूर्ण होण्यासाठी शासनाचे त्या संदर्भातील नियोजन हे अचूक पाहिजे असा विचार या संदर्भात स्पष्ट करण्यात आला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही भारतामध्ये कशी गरजेची आहे या योजनेमध्ये कशाप्रकारे बदल होत गेले तसेच किंमत निर्धारण घटक, हमी भाव, धान्याच्या किंमती व देशाची अन्न–धान्याबाबतची धोरणे या सर्व घटकांचा आढावा या संदर्भामधून प्रस्तुत संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

४. George P.S., Public Distribution System, Food subsidy and price policy, in Agricultural Price Policy For Developing Countries Mellor and Ahmed, 1988. रेशनधान्य दुकानातून वितरीत करण्यात येत असलेल्या गहू व तांदूळ या धान्याच्या किंमतीच्या चढ उताराचा आढावा या संदर्भात घेण्यात आला आहे. खुल्या बाजारातील धान्याची किंमत, सवलतीच्या दरातील अन्न–धान्याच्या किंमती, किंमत निर्धारण घटक व त्यांचे परिणाम या संदर्भात चर्चा प्रस्तुत संदर्भात करण्यात आली आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेमध्ये गहू व तांदूळ या महत्त्वाच्या धान्याचे वितरण करण्यात येते, त्यांच्या किंमत धोरणाचा अभ्यास करणे ही बाब मुलभूत आहे. १९८९ ते १९९५ या काळातील धान्याच्या किंमतीमधील चढ उतार व त्याच्या परिणामांचा आढावा प्रस्तुत संशोधन विषयात घेतला आहे.

भारतातील अन्नसुरक्षा योजनेच्या संदर्भामध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा अभ्यास आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थानमधील काही गावांचा अभ्यास बापना यांच्या संदर्भात करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील लोकांमध्ये अन्न–धान्याच्या पुरवठयाची गरज किती प्रमाणात आहे, सामाजिक मागासलेपणा, लोकांच्या सामाजिक समस्या, गरिबी, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील धान्याची उपलब्धता या योजनेशी संबंधित सर्व आकडेवारी याबाबतचा संपूर्ण अभ्यास या संदर्भात केलेला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही प्रामुख्याने अन्न–धान्याचा हक्क देणारी महत्त्वाची योजना आहे. या योजनेचे यश किंवा अपयश हे या योजनेच्या अंमलबजावणीवर अवलंबून आहे. धान्याच्या उत्पादनावर, उपलब्धतेवर व धान्य उत्पादनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा योग्य अभ्यास करुन या योजनेची अंमलबजावणी योग्य पध्दतीने व्हायला पाहिजे हे या संदर्भातून स्पष्ट करण्यात आले आहे.

५. Sastry, Hanumantha Rao and Narasinga Rao, Welfare Implications of Rice Subsidy scheme, Andhra Pradesh Economic Association Conference Papers, January 20, Harderabad, 1990. 44 व्या नॅशनल सॅम्पल सर्व्हेनुसार भारतात १९८८ मध्ये ७८% गरीब लोक हे सवलतीच्या दरातील तांदळाची खरेदी करत होते. लाभार्थी नसलेल्या लोकांचाही समावेश यामध्ये होता. तांदूळ खरेदी करत असलेल्या लाभार्थ्यांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण, सवलतीच्या दरात धान्याची खरेदी करत असलेल्या व त्यांच्यावर उदरनिर्वाह करत असलेल्या लोकांचा तपशील यामध्ये आहे. सार्वजनिक

स्वस्तधान्य वितरण योजनेमध्ये असलेले लाभार्थी व जे लाभार्थी नाहीत त्यांची कौटुंबिक स्थिती व सामाजिक स्तरातील फरक या संदर्भात स्पष्ट करण्यात आला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत योग्य निकषांच्या आधारे लाभार्थी व बिगर लाभार्थी असे वर्गीकरण करण्यात येते.

नागरिकांच्या उत्पादनाच्या आधारावर त्यांची विभागणी करण्यात येते. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत नसलेल्या लोकांची अन्न-धान्याची गरज कशी पूर्ण होत तसेच खुल्या बाजारातील धान्याची खरेदी त्यांना करणे शक्य आहे काय? या सर्व घटकांचा आढावा या संदर्भात आहे. खुल्या बाजारातील धान्याची खरेदी, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील धान्याची किंमत या सर्व घटकांचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत संदर्भाचा उपयोग केला आहे.

६. Chellaraj G., Wade Brorsen and Paul L. Farris, Impact of rice subsidy on Food Consumption in India, Indian Journal of Agriculture Economics, vol.47, No. 2, 1992. खुल्या बाजारातील धान्याची किंमत व धान्याचे वितरण, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेला पुरवण्यात आलेल्या सवलतीच्या दरातील धान्याची किंमत व वितरण या दोन्ही घटकांचा तुलनात्मक अभ्यास या संदर्भात आहे. भारतातील १५ राज्यांपैकी ९ राज्यांमध्ये तांदूळ या धान्याचे वितरण करताना वाढत्या शहरीकरणाचा परिणाम होतो असे निरीक्षण या संदर्भात नोंदवण्यात आले आहे.

सर्व राज्यांतील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत तांदूळ धान्य महत्त्वाचे आहे. केरळ या राज्यामध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही ग्रामीण व शहरी भागामध्ये पारदर्शकपणे राबवली जाते. पण बिहार या राज्यामध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना पारदर्शकपणे राबवली जात नाही याची कारणे या संदर्भात दिली आहेत या कारणांचा अभ्यास करणे सर्वच राज्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेसाठी आवश्यक आहे. तांदूळ व गहू साठवण्यासाठी चांगल्या गोदामांची गरज आहे. गहू व तांदळाचे उत्पादनाचे प्रमाण व सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून होणारे वितरणाचे प्रमाण, वितरणावर परिणाम करणारे विविध घटक, या सर्व घटकांचा अभ्यास या विषयामध्ये करण्यात आला आहे.

७. Dantwala M. L., Agricultural Policy: Prices and Public Distribution System: A Review, India Journal of Agricultural Economics, Vol. 48, No. 2,1993. अन्न-धान्याच्या

किंमत धोरणाबाबत जागतिक बँकेने केलेल्या अहवालाचे विश्लेषण व सूचनांचा अभ्यास या संदर्भात आहे. सरकारचे सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील योगदान, धान्याची खरेदी व धान्याची साठवणूक खाजगी व्यापार याबाबतचे विश्लेषण या संदर्भात आहे. धान्याच्या उपलब्धतेवर व सरकारच्या धोरणांवर सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना अवलंबून आहे.

कोणतीही योजना अंमलबजावणी ही त्या योजनेच्या उपयुक्ततेवर व प्रशासनाच्या कार्यवाहीवर अवलंबून असते असे निरीक्षण या संदर्भात मांडण्यात आले आहे. सरकारची कोणतीही योजना असो मग ती वाणिज्य असो किंवा शेतीशी संबंधित असो प्रस्तावित योजना संबंधित विभागांना किती उपयोगी आहे व ती किती प्रभावीपणे राबवता येते त्यावर या योजनेचे यश अवलंबून असते.

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना प्रभावी अंमलबजावणीने सफल करता येईल. सरकारचे नियोजन, राजकारण्यांचा हस्तक्षेप, प्रशासनाची भूमिका या सर्व बाबींचा तपशील या संदर्भाच्या माध्यमातून संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

८. Parikh K., Who get How much from PDS —How Effectively Does it Reach the poor, Sarvekshana, January-March, 1994. उत्तरप्रदेशातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेशी संबंधित काही आकडेवारी या संदर्भात आहे. भारतात सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून वितरीत होत असलेल्या धान्यांपैकी १६.७% तांदूळ सर्व लाभार्थी खरेदी करतात व गव्हाची खरेदी ही १२.६% होते. उत्तर प्रदेश राज्यातील ग्रामीण भागात तांदूळ व गव्हाची खरेदी ही अनुक्रमे २.४ व ४.४% होते तर साखर व रॉकेल खरेदी ही २९ व ७% होते. या अहवालानुसार उत्तर प्रदेश, बिहार व ओरिसा राज्यांमध्ये ग्रामीण भागातील ९८% लोक हे सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील धान्य खरेदी करत नाहीत किंवा या योजनेबाबत ते अनभिज्ञ आहेत. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना सवलतीच्या दरात धान्याचे वितरण करत असूनही लोकांना या योजनेबाबत माहिती कमी आहे असे या संदर्भित अभ्यासातून स्पष्ट होत आहे.

अन्न ही माणसांची मुलभूत गरज आहे. अन्नाची गरज भागवणे ही जबाबदारी शासनाचीही आहे त्यामुळे सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही शासनाने चालू केलेली आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना कार्यरत आहे. प्रत्येक राज्याचे नेतृत्व करणारे लोक

वेगवेगळे आहेत त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीत फरक आहे. त्यामुळे विविध राज्यांतील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनांचा अभ्यास करुन उपयोगी शिफारशींचा अभ्यास प्रस्तुत संशोधन विषयात केला आहे.

९. Vyas V. S., and Pradeep Bhargava, Public Intervention for Poverty Alleviation, Economic and Political Weekly, October 14 – 21,1995. भारतातील लोकांच्या गरीबीची कारणे, दारिद्रय निर्मूलनाच्या कार्यक्रमांची माहिती या संदर्भात दिली आहे. १९७१ ते १९८९ च्या दरम्यान सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या माध्यमातून धान्य वितरणाचे प्रमाण चारपट वाढले. गहू व तांदूळ वितरणाच्या% वारीचे विश्लेषण यामध्ये आहे. भारतातील काही राज्यांमध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेसाठी शासन मोठया प्रमाणात खर्च करत आहे पण त्या खर्चाच्या प्रमाणात ही योजना म्हणावी तेवढी यशस्वी ठरलेली नाही असे निरीक्षण या संदर्भात नोंदवण्यात आले आहे. आंध्रप्रदेश, गुजरात, केरळ व महाराष्ट्र या राज्यांमध्ये गरीब ग्रामीण कुटुंबांसाठी सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही फार गरजेची ठरली आहे असा निष्कर्ष या संदर्भात आहे.

१०. Rao C. H. Hanumantha, Liberalization of Agriculture in India:Some Major Issues, Indian Journal of Agricultural Economics, Vol. 50, NO. 3, 1995. देशाच्या अर्थव्यवस्थेचा व शेतीचा जवळचा संबंध आहे. देशांतर्गत व देशाबाहेरील व्यापाराचे उदारीकरण करण्यासाठी शेतकरी वर्गाला प्रोत्साहन द्यायला पाहिजे. शेतकऱ्यांच्या संसाधनांची स्थिती वाढवून त्यांची शेती पध्दती आधुनिक केल्यास अन्न–धान्याच्या उत्पादनात वाढ होईल. शेतीचे उत्पादन वाढल्यास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल व अन्न–धान्याच्या बाबतीतही लोक स्वयंपूर्ण होतील.

एकंदरीतच शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावयाला पाहिजे असा निष्कर्ष या संदर्भातून मिळतो. शेतकऱ्यांनी जर अन्न–धान्याचे उत्पादन जास्त प्रमाणात घेतले तर शासनाला फायदा होणार आहे. प्रस्तुत संशोधन विषयाची अनुसूची तयार करताना शेतकरी लोकांच्या संदर्भात काही प्रश्नांचा समावेश या संदर्भाच्या आधारे केला आहे.

११. Dev Mahendra, Alleviating Poverty–Maharashtra Employment Guarantee Scheme, Economic and Political Weekly, October 14-21, 1995. प्रस्तुत संदर्भात

महाराष्ट्रातील गरिबी निर्मूलन कार्यक्रमाचा आढावा घेतला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत डिसेंबर १९९० मध्ये महाराष्ट्र राज्यात रेशन धान्य दुकानांची संख्या ३५१९९ इतकी होती. १९८३ मध्ये राज्यातील अन्न–धान्याचे दरडोई वितरण हे २२.७ किलोग्रॅम होते. बिहार, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश सारख्या गरीब राज्यांच्या तुलनेत हे प्रमाण खूप जास्त आहे. १९८८ ते १९८९ साली संपूर्ण भारताच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यामध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या अंतर्गत संपूर्ण अन्न–धान्याचे वितरण हे ९.६%  होते. महाराष्ट्र राज्यामध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा विस्तार कसा होत गेला, लाभार्थी, रेशन धान्य दुकानदारांची वाढलेली संख्या, धान्य वितरणाचे वाढते प्रमाण या सर्व घटकांची माहिती प्रस्तूत संदर्भात आहे.

१२. Vyas V. S. Ensuring Food Security – The State, Market and Civil Society, Economic and Political Weekly, December 9, 2000  अन्नसुरक्षा संकल्पनेचा अर्थ या संदर्भात स्पष्ट केला आहे. पौष्टिक अन्न प्रत्येक गरीब माणसाला उपलब्ध करुन देणे व त्या उपलब्धततेची हमी देणे यालाच अन्नसुरक्षा असे म्हणतात. विकसित व विकसनशील देशांनी नागरिकांना अन्नाची हमी दिली असली तरी राज्यातील नागरिकांनी स्वत: अन्न मिळवण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे असे या संदर्भात स्पष्ट केले आहे.

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेमध्ये केंद्र, राज्य व जिल्हा या तीन घटक महत्त्वाचे आहेत त्यांच्या जबाबदारीचे विश्लेषण या संदर्भात करण्यात आले आहे. अन्न–धान्याच्या मागणीनुसार शासनाने जर धान्याचा पुरवठा केला तर प्रत्येक नागरिकाला धान्य उपलब्ध होवून सर्वांची धान्याची गरज भागेल.

ग्रामीण भागातील लाभार्थ्यांची निवड अचूक करुन त्यांना धान्य वितरण केले तर कोणीही अन्न–धान्यापासून वंचित राहणार नाही. सर्वसामान्य गरीब व्यक्ती व प्रशासन यांच्यात योग्य संवाद असायला पाहिजे गरजू लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिल्याने ही योजना पूर्णपणे यशस्वी झालेली नाही असे या संदर्भात स्पष्ट केलेले आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या घटकांचा अभ्यास या संदर्भाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

१३. Vidyanathan A., Poverty and Development Policy, Economic and Political Weekly, May 26, 2001. प्रस्तुत संदर्भामध्ये गरीबीचे मोजमाप करण्याचे निकष व त्यांच्या समस्या हाताळण्यासाठी असलेल्या धोरणांवर चर्चा करण्यात आली आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील धान्य वितरणाचा अभ्यास यामध्ये करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील गरजू लोकांपर्यत ही वितरण व्यवस्था अजून संपूर्णपणे पोहोचलेली नाही हा निष्कर्ष या संदर्भात आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही ठरवलेल्या उदिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासकिय अडचणी व राजकिय अडचणी आहेत. शासकिय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रबळ राजकिय इच्छाशक्ती जर राजकारणी लोकांकडे नसेल तर योजना यशस्वी होणार नाही.

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही दारिद्रय निर्मूलनासाठी आवश्यक आहे. गरीब लोकांना अन्न–धान्य देण्याचे महत्वाचे काम या योजनेच्या माध्यमातून होते. त्यामुळे या योजनेचे अनेक समर्थक आहेत. त्यामुळे या संदर्भाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या माध्यमातून लोकांना अन्न–धान्य मिळते अन्न ही मुलभूत बाब आहे. प्रशासकिय धोरण, राजकिय इच्छाशक्ती व या योजनेची प्रभावी अंमलबजावणी या घटकांवर सार्वजनिक स्वस्तधान्य विरतण योजनेचे यश अवलंबून असते.

१४. Dutta Bhaskar and Ramaswami Bharat, Targeting and Efficiency in the public Distribution System–Case of Andhara Pradesh and Maharashtra Economic and Political Weekly May 05, 2001. महाराष्ट्र व आंध्रप्रदेश राज्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा तूलनात्मक अभ्यास या संदर्भात करण्यात आला आहे. नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या ५० व्या फेरीतील अन्न–धान्याच्या सवलतींमधील निष्कर्षाबाबतही यामध्ये अभ्यास करण्यात आला आहे.

आंध्रप्रदेश राज्यातील तांदूळ अनुदान योजना ही महाराष्ट्र राज्याच्या खादय अनुदान कार्यक्रमांपेक्षा तीन पट अधिक आहे. आंध्र प्रदेशातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील वाटप करण्यात येत असलेल्या धान्याचे प्रमाण हे महाराष्ट्र राज्यापेक्षा दुप्पट आहे याचाच अर्थ आंध्रप्रदेशात

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना यशस्वी ठरली आहे. आंध्रप्रदेशाच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील फक्त ३०% लोकांपर्यंत सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना पोहोचली आहे.

सर्वसामान्य लोकांपर्यंत योजनेच्या माध्यमातून सवलतीच्या दरात धान्य पोहोचवण्यासाठी सरकारने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी असे या संदर्भात म्हटले आहे. धान्याच्या किंमतीपासून वितरणापर्यंतचे नियोजन जर काटेकोरपणे झाले तर या योजनेचे लाभार्थी वाढतील व शेवटच्या स्तरापर्यंत धान्य पोहोचवणे शक्य होईल. प्रस्तुत विषयाचे संशोधन करताना अंमलबजावणी बाबत काही महत्त्वाचे मुददे तसेच या योजनेचा लाभ खरोखरच कोणाला गरजेचा आहे, ही योजना ग्रामीण भागात का? पोहोचणे आवश्यक आहे. याबाबतचा आढावा या संदर्भातून घेतला आहे.

१५. Government Of India, Planning Commission Approach Paper to the Tenth Five Year Plan ( 2002-07) , May, 2001 नियोजन आयोगाच्या निरीक्षणानुसार सन १९९० च्या दशकात अन्न–धान्यावरील सवलत ही २४५० कोटी होती व ही सवलत २००० मध्ये १३००० कोटी पर्यंत पोहोचली. पण सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थ्यांच्या आकडेवारीचा जर विचार केला तर ही वाढ पुरेशी नाही. राष्ट्रीय स्तरावर या योजनेतून गहू वितरणाचे प्रमाण हे ३६% आहे तर तांदूळ व साखर वितरणाचे प्रमाण हे अनुक्रमे ३१ व २३% आहे. तसेच गरीबी निश्चित करण्याचे निकष यांमध्येही काही सुधारणा व्हायला पाहिजेत कारण आजही काही श्रीमंत लोक हे गरीबांच्या ओळीत आहेत. गरीब लाभार्थी हे सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून एकाचवेळी २० किलोग्रॅम धान्य घेवू शकत नाहीत. कारण त्यांच्या जवळ एवढा पैसा नाही तसेच त्यांना दोन टप्प्यात धान्य देणे प्रशासनालाही शक्य नाही.

जागतिक बँकेच्या जून २००० च्या अहवालानुसार भारतातील अनेक राज्यांकडील असणारा धान्याचा साठा हा जुना आहे. त्यामधील काही धान्य तर १६ वर्षापूर्वीचे जुने आहे. धान्याची देखभाल करणारी यंत्रणा ही सक्षम नाही. धान्याची काळजी योग्य पध्दतीने घेतली जात नाही. ज्या राज्यांमध्ये रेशन धान्य दुकानदारांना धान्य वितरणासाठी जास्त कमिशन दिले आहे त्या राज्यांमध्ये ही योजना प्रभावीपणे राबवली जात आहे असा निष्कर्ष हा नियोजन आयोगाने नोंदवला आहे. काळया बाजारातील

धान्याबाबतचेही मत या संदर्भात मांडले आहे. लाभार्थ्यांचे निकष, धान्य वितरणाचे प्रमाण, धान्य साठवण्याचे गोदाम, इ. मुद्यांचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी वरील संदर्भाचा अभ्यास केला आहे.

१६. Ramaswami Bharat, Efficiency and equity of Food Market Interventions, Economic and Political Weekly March 23, 2002. अन्न–धान्याच्या खरेदी संदर्भात शासनाची भूमिका कशी असायला पाहिजे याबाबतचे मत या संदर्भात मांडले आहे. आंतरराष्ट्रीय धान्याच्या व्यापारात किंमत निर्धारण हा घटक फार महत्त्वाचा आहे त्यामुळे स्थानिक पातळीवरही अन्नाधान्याच्या किंमती स्थिर रहातात किंवा त्यामध्ये बदल होतो.

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही अन्न–धान्याच्या किंमतीवर व धान्याच्या उपलब्धतेवर कार्य करत असते. या योजनेतील लाभार्थी निकष हा तितकाच महत्त्वाचा निकष आहे. गहू व तांदळाचे उत्पादन त्यामधील वाढ किंवा घट या बाबींचाही परिणाम हा सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेवर होत असतो असा निष्कर्ष या संदर्भात स्पष्ट करण्यात आला आहे.

१७. Rajkrishna," Government Operation in Foodgrains", The Economic and Political Weekly, Sept., 1976. प्रस्तुत अभ्यास शासनाच्या अन्न–धान्याच्या योजनांच्या संदर्भात भाष्य करतो. सार्वजनिक स्वस्तधान्य योजनेतील लाभार्थी, एकूण लोकसंख्या, या योजनेसाठी जे लाभार्थी पात्र नाहीत त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती, शेतकरी कुटुंबे त्यांचे आर्थिक स्थैर्य अशा पैलूंवर प्रकाश या संदर्भात टाकलेला आहे. या संदर्भाचा उपयोग संशोधन विषयात करण्यात आला आहे. लाभार्थ्यांचे निकष, कौटुंबिक आर्थिक परिस्थिती, शेतकरी कुटुंब अशा काही महत्त्वाच्या घटकांचा आढावा या संशोधन विषयाच्या माध्यमातून घेतला आहे.

१८. Gupta, Arvind, "Public Distribution of Foodgrains in India", CMA,IIM, Ahmedabad, 1977. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या परिणामांचा अभ्यास हा या संदर्भात केलेला आहे. अन्न–धान्याच्या किंमतीच्या स्थैर्याबाबतचा आढावा यामध्ये घेण्यात आला आहे. धान्याची आवश्यकता, धान्याची खरेदी, धान्याचे वितरण या घटकांचा तपशील या संदर्भात आहे.

शासनाकडून धान्याचे सवलतीच्या दरात वितरण होत असताना अन्न–धान्याची खरेदी, खुल्या बाजारातील धान्याची किंमत अशा अनेक महत्त्वाच्या बाबींचा संबंध या योजनेशी आहे. त्यामुळे या संदर्भाचा अभ्यास करण्यात आला आहे.

१९. Bapna, S. L. " Food Security through the PDS - The Indian Experience", March, 1980. प्रस्तुत अभ्यास सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे स्वरुप स्पष्ट करण्यात आले असून या योजनेचे धोरण कसे तयार होते, योजनेचे उदिष्ट, अन्न–धान्याची खरेदी आणि वितरण या सारख्या इतर काही महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास या संदर्भात करण्यात आला आहे. अन्न–धान्याचे खाजगी वितरण किंवा त्यासंबंधात खाजगी व्यापार हा सार्वजनिक स्वस्तधान्य वितरणाच्या तुलनेत फारच स्पर्धेचा दिसून आला.

खुल्या बाजारातील धान्याच्या वितरणापेक्षा ही योजना प्रभावी करायची असेल तर त्यामध्ये अनेक बदल करावे लागतील. खुल्या बाजारातील अन्न–धान्याची किंमत व सवलतीच्या दरातील अन्न–धान्याची किंमत याबाबतचे विश्लेषण या संदर्भात करण्यात आले आहे. शासनाची अन्न–धान्याची धोरणे, सवलतीच्या दरात धान्य वाटण्याची आवश्यकता, खुल्या बाजारातील धान्याच्या किंमतींचे चढउतार अशा अनेक बाबींची माहिती घेण्यासाठी हा संदर्भ अभ्यासण्यात आला आहे.

२०. Balakrishnan, "Quality of PDS - Why it Matters", Economic and Political Weekly, Jan, 1997. प्रस्तुत लेखामध्ये अन्न–धान्याच्या खुल्या बाजारातील किंमती व सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील सवलतीच्या धान्याची किंमत यांचा संबंध अभ्यासात आला आहे. अर्थव्यवस्थेमध्ये अन्न–धान्याच्या किंमतीला फार महत्त्वाचे स्थान आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या माध्यमातून गरीब लोकांचे कल्याण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे शासनाच्या धोरणांवर या योजनेचे कार्य व यश अवलंबून आहे असे मत या संदर्भ अभ्यासात मांडण्यात आले आहे. भारतातील विविध राज्यांच्या सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्थेचा जर अभ्यास केला तर या योजनेतील सर्वात महत्त्वाचा घटक हा अन्न–धान्याची किंमत निर्धारण व राज्याची या बाबतची धोरणे हा आहे. जे लोक

खरोखरच दुर्बल आहेत, गरीब आहेत त्यांना या योजनेतील धान्य मिळाल्याने त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला आहे त्यांच्यासाठी ही योजना फार लाभदायक ठरली आहे.

परंतु काही गरीब लोकांना धान्याचा लाभ मिळत नाही हे वास्तव आहे. असे निरीक्षण या संदर्भात नोंदवलेले आहे. किंमत निर्धारणातील शासनाची भूमिका, सार्वजनिक स्वस्तधान्य योजनेची लोकांना असलेली गरज, या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा आढावा या संदर्भात घेण्यात आला आहे. या सर्व घटकांचा उपयोग सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनांचा अभ्यास करताना करण्यात आला आहे.

२१. Nawani, N.P., "Towards Food for All-Ideas For A New PDS",Ministry of Information and Broadcasting, Govt, of India, New Delhi, 1995. संदर्भित अभ्यास हा चमाली व उत्तर काशी जिल्ह्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेशी संबंधित आहे. या दोन्ही जिल्हयातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील स्वस्तधान्य दुकानदार, लाभार्थी, प्रशासन, या योजनेतील महत्त्वाचे घटक या बाबतचा आढावा घेण्यात आला आहे. धान्याची उपलब्धता, लोकांची आर्थिक परिस्थिती, लोकांचे या योजनेतील धान्य खरेदी करण्याचे प्रमाण याबातची निरीक्षणे यामध्ये नोंदवण्यात आली आहेत. पौष्टिक अन्न–धान्याचे वितरण हे या योजनेच्या माध्यमातून होत नाही असा निष्कर्ष या संदर्भ अभ्यासात मांडण्यात आला आहे. अन्नसुरक्षा, भारत आणि जग या बाबींचाही आढावा या अभ्यास घेण्यात आला आहे.

एकंदरीतच भारतातील अन्नसुरक्षा योजना जगातील फार मोठी योजना ठरली आहे त्यामुळे या योजनेचा अभ्यास करताना त्याबातची सरकारची धोरणे, या योजनेची आवश्यकता खरोखरच गरीब लोकांना आहे काय? अन्नसुरक्षाबाबत भारताचा हेतू इ. घटकांचा अभ्यास करण्यासाठी संदर्भित अभ्यास प्रस्तुत संशोधन विषयासाठी महत्त्वाचा वाटला.

२२. Jha, R, Gaiha, R, Pandey, M. K., and Kaicher, H (2013) Food Subsidy Income Transfer and the Poor; A Comparative Analysis of the Public Distribution System in India's States. Journal of Policy Modeling 35 (6) 887 – 908. प्रस्तुत अभ्यास हा लोकांना अन्न–धान्य पुरेसे मिळावे यासाठी २०११ च्या अन्न–धान्य धोरणात भारत शासनाने केलेल्या तरतुदींच्या

संदर्भात केलेला आहे. या धोरणात धान्याची अफरातफर व अन्न–धान्य किंमत धोरण या महत्त्वाच्या घटकांवर चर्चा करण्यात आली. भारतीय लोकसंख्येला पुरेल एवढे धान्याचे उत्पादन वाढवून ते धान्य सर्व लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे असे मत यामध्ये नोंदवले आहे. अन्न–धान्याचे उत्पादन वाढल्यानंतर त्या धान्याचे वाटप न्याय पध्दतीने करण्यासाठी सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना पारदर्शक होणे गरजेचे आहे असे मत या संदर्भात नोंदवले आहे.

२३. Khera, R, (2011 c), Trends in Diversion of PDS Grain, Economic and Political Weekly 46 (21), 106-114. प्रस्तुत लेखातून सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील धान्याचे वाटप सर्व गरजू लोकांना पारदर्शकपणे करायला पाहिजे कारण खुल्या बाजारातील अन्न–धान्याच्या किंमती या लोकांना परवडणाऱ्या नाहीत असे मत ६१ व्या छ्ड च्या फेरीत नोंदवले आहे. भारतातील सर्व राज्यांमध्ये ही योजना एकसारख्या नियमांप्रमाणे राबवण्यात येत नाही. प्रत्येक राज्यातील लाभार्थी भिन्न आहेत.

म्हणजेच सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या अंमलबजावणीत फरक असल्यामुळे काही राज्यात ही योजना यशस्वी झाली आहेत तर काही राज्यांमध्ये ही योजना अयशस्वी आहे. राजकिय इच्छाशक्ती प्रबळ असलेल्या राज्यामध्ये ही योजना यशस्वी आहे असे मत या संदर्भात व्यक्त करण्यात आले आहे.

२४. Pal, B. (2011) “Organization and Working of Public Distribution System in India: A Critical Analysis”, International Journal of Business Economics & Management Research, 1/1, 40-48. श्री पाल यांनी प्रस्तुत अभ्यासातून फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया व सेन्ट्रल वेअरहाउसिंग कॉरपोरेशन चे कार्य स्पष्ट करण्यात आले आहे. धान्य साठवण्याची पध्दती तसेच धान्याची वाहतूक पध्दती याबाबतचा आढावा या संदर्भाच्या माध्यमातून घेण्यात आला आहे. या संदर्भातील सर्वेक्षणानुसार सध्याची स्वस्तधान्य वितरण योजना ही अतिशय भ्रष्ट आहे. रेशन कार्ड वाटप असेल, रेशन धान्य दुकान परवाना असेल तसेच धान्याचे वितरण असेल या सर्व बाबींमध्ये भ्रष्टाचार आहे.

सार्वजनिक वितरण योनेतील लाभार्थी, प्रशासन, रेशन धान्य दुकानदार, पुरवठा विभाग, धान्य गोदामे असे काही महत्त्वाचे घटक आहेत त्यांचा संदर्भ जुळवून या योजनेचा विविध स्तरावर चिकित्सक अभ्यास करुन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे त्याबाब काही महत्त्वाच्या घटकांची माहिती वरील संदर्भात मिळाली आहे त्यामुळे या संदर्भाचा अभ्यास केलेला आहे.

२५. Ray, S., & Ray, I. A. (2011). Role and Effectiveness of Public Distribution System in Assuring Food Security in India: An Appraisal. Journal of Economics and Sustainable Development, 2(4), 238-251. प्रस्तुत संशोधनात्मक निबधात भारतातील मागील काही दशकांतील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील धान्य वाटपाच्या काही महत्त्वाच्या समस्यांचे विश्लेषण यामध्ये करण्यात आले आहे. धान्याची उपलब्धता तसेच धान्याची साठवणूक क्षमता, धान्य खरेदीची प्रक्रिया या सर्वांचा परिणाम सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेवर कसा होतो या बाबतचे विश्लेषण करण्यात आले आहे. अन्न धान्याची योजना राबवण्यासाठी आलेल्या अडचणींवर उपाय शोधण्याचे कामही या संदर्भात करण्यात आले आहे. त्यांच्या संदर्भानूसार सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही योग्य प्रकारे कार्यवाहित होण्यासाठी शासनाच्या अंमलबजावणी धोरणात लवचिकता पाहिजे. ज्या लोकांना या योजनेतील धान्याची गरज आहे त्यांना धान्य वितरीत करायला पाहिजे म्हणजेच या योजनेच्या अंमलबजावणीतील घटकांना या वितरण योजनेत महत्त्वाचे स्थान आहे. संदर्भित संशोधन विषयामध्ये या संदर्भाचा वापर करताना प्रशासकिय घटकांचा तसेच इतर आधारभूत बाबींचाही चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

२६. Tritah, A. (2003). The Public Distribution System in India: Counting the poor from making the poor count. Toulouse, France: Universite des Sciences Sociales, Groupe de Recherche en Economie Mathématique et Quantitative. प्रस्तुत अभ्यासात भारतातील गरीब लोकांसाठी धान्य वितरणावर देण्यात येत असलेल्या सवलतीचा अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास या संदर्भात करण्यात आला आहे. योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या

योजनेतील अडचणींचा आढावा घेणे आवश्यक आहे. लोकसंख्या वाढताना त्यासंबंधित योजनांमध्ये बदल करणे काळानुसार क्रमप्राप्त आहे. दारिद्र्रेषा ठरवताना त्यांच्या निकषांचा अभ्यास करुन पारदर्शक निवड होण्यासाठी त्याबाबतचे योग्य सर्वेक्षण व्हायला पाहिजे असे मत या संदर्भात मांडण्यात आले आहे. लोकसंख्या वाढ तसेच दारिद्र्य सर्वेक्षण, योग्य लाभार्थ्यांची निवड या संदर्भातील बाबी सार्वजनिक वितरण योजनेशी संबंधित असल्यामुळे या संदर्भाचा अभ्यास करण्यात आला आहे.

२७. Mooij, J. (2001). Food and Power in Bihar and Jharkhand: PDS and its Functioning. Economic and Political Weekly, 3289-3299. प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून भारतातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या ऐतिहासिक व राजकिय मूल्यमापन करण्यात आले आहे. १९३९ मध्ये ही योजना चालू झाली व टप्याटप्याने या योजनेचा विस्तार करण्यात आला. ब्रिटिशांनी जरी ही योजना १९३९ मध्ये चालू केली असली तर भारतातील अनेक शहरांमध्ये या योजनेचा विस्तार हा खरा तर दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर झाला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर म्हणजे १९४७ मध्ये अन्न–धान्याच्या दुसऱ्या अन्न–धान्य धोरणाच्या समितीच्या शिफारशींमध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या अडचणींमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. अमेरिकेकडून खरेदी करण्यात आलेल्या गव्हाबाबतच्या धोरणांचाही तपशील यामध्ये देण्यात आला आहे. या संदर्भाचा आधार हा भारताच्या सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या सैधान्तिक पार्श्वभूमी लक्षात घेण्यासाठी करण्यात आला आहे.

२८. Ahluwalia, D. (1993). Public Distribution of Food in India: Coverage, targeting and leakages. Food Policy, 18(1), 33-54. प्रस्तुत अभ्यासात भारताच्या सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या कामगिरीचे मूल्यमापन केले आहे. दारिद्र्यरेषा ठरविण्यासाठीचा झालेले सर्वेक्षण योग्य पध्दतीने असावे. राज्यसरकारने त्या सर्वेक्षणाला महत्त्व द्यायला पाहिजे. त्यामुळेच या योजनेचे लाभार्थी निवडताना योग्य लाभार्थ्यांची निवड होणार आहे. रेशन कार्डच्या संबंधातील नियमांचे योग्य पध्दतीने पालन व्हायला पाहिजे. स्थानिक पातळीवरील धान्याचे उत्पादन झाल्यावर त्या धान्याची खरेदी ही शासनाने करुन

त्याच ठिकाणी वितरीत करायला पाहिजे त्यामुळे धान्याच्या वाहतूकीचा खर्च होणार नाही व शासनाचा फायदा होईल. सार्वजनिक वितरण व्यवस्था प्रभावी होण्यासाठीच्या विविध शिफारशी या संदर्भात सूचवल्या आहेत.

२९. Jha Raghbendra, K. V. Banu Murthy, Hari K. Nagaranjan and Ashok K. seth, Real Consumption Levels and Public Distribution System In India, Ecomomic and Political Weekly, April 10, 1999**.** प्रस्तुत संशोधनात्मक निबंधात सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अनुदान प्रक्रियेबाबत मत व्यक्त केले आहे. अभ्यसात २५ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश करण्यात आला आहे. १९९० ते १९९३ या कालावधीतील हा अभ्यास आहे. या अभ्यासातील निष्कर्षानुसार नागरिकांच्या उत्पन्नापेक्षा सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील शासनाचे धान्याचे अनुदान जास्तीचे होते. अन्न-धान्याचा कोटा व प्रत्यक्ष उचल अशाप्रकारची तफावत ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये होती. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेमध्ये धान्याची उचल करत असताना प्रत्यक्ष मागणी व धान्याची उपलब्धता यामध्ये मेळ लागत नाही. त्यासाठी काही उपाय सुचवण्याचे प्रयत्न यामध्ये करण्यात आले आहेत.

**३०. ॲड.संजय घायाळ, पुर्नलेखन ॲड. विष्णू खणके, अत्यावश्यक वस्तू अधिनियम -१९५५, २००५ :** प्रस्तुत अभ्यासामध्ये अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम वस्तू व विशेष तरतूदी १९८१, काळा बाजार करण्यास प्रतिबंध, महाराष्ट्र रॉकेल विक्री परवाने आदेश, १९६६ रॉकेल वापरावरील मर्यादा आणि अधिकतम किंमत निश्चित करणे आदेश, ठोक विक्री आणि पुर्नविक्री परवाने आदेश, व इतर महत्त्वाचे निर्णय या घटकांचे सविस्तर विश्लेषण या पुस्तकात केलेले आहे.

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्थेचे तसेच शिधापत्रिकांचे संपूर्ण संगणकीकरण करणे, अन्न-धान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाहतूक कंत्राट निश्चित करण्याचे नियम, कंत्राट कालावधी व मुदतवाढ, जिल्हयासाठीची निविदा, वाहतूक साधने, वाटाघाटी व निविदा मंजुरीचे अधिकार, अंतरे प्रमाणित करणे, आणीबाणी व निकडीच्या प्रसंगी वाहतूक करणे, गावपातळीवर स्वस्तधान्य

दुकानदाराला परवाना देतानाचे निकष, धान्य वहातूक कंत्राट, धान्याचे दर ठरवणे, वहातूक करताना त्यांना द्यायचा दर, शासन स्तरावर नियतनांची अंमलबजावणी कशी होते, शासनाचे सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे आदेश, विविध परिशिष्टे व अर्ज यांचा संदर्भ घेवून सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची अंमलबजावणी कशाप्रकारे होते ते जाणून घेण्यासाठी या संदर्भग्रंथाचा आढावा संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

३१. **गौरव दत्त व अश्विनी महाजन, भारतीय अर्थव्यवस्था, एस. चंन्द ॲन्ड कंपनी प्रा. ली.,२०१३, ५० आवृत्ती:** प्रस्तुत ग्रंथाची विभागणी एकूण दोन मुख्य भागात असून एकूण ६० प्रकरणांचा समावेश यामध्ये केलेला आहे. एकूण १०५० पानांचे हे पुस्तक आहे. या संदर्भ ग्रंथाचे लेखन हिंदी भाषेत आहे. भारतातील गरीबी, गरिबीची कारणे, आर्थिक सुधारणा, गरीबी कमी करण्याचे उपाय, गरीबी हटाओ कार्यक्रम व त्याचे झालेले फायदे, पंचवार्षिक योजना व त्यामध्ये शेती विकासाठी केलेली तरतूद, शेती क्षेत्रावर आलेले संकट, उत्पादन कमी होण्याची कारणे, भारताला अन्नसुरक्षा योजनेची गरज, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा लोकांना झालेला फायदा, सार्वजनिक वितरण योजना प्रभावी होण्यासाठी उपाय, लक्षित सार्वजनिक वितरण प्रणाली, दहावी पंचवार्षिक योजना व अन्नसुरक्षा, जगातील अन्नसुरक्षेसाठी असलेल्या विविध योजना या सर्व घटकांचा सविस्तर आढावा भारतातील अन्नसुरक्षा या प्रकरणात घेतला आहे. हरित क्रांती त्यानुसार आखलेली नवीन शेतीविषयक धोरणे व त्याचे झालेले फायदे हे सर्व घटक संशोधन विषयासाठी महत्त्वाचे आहेत.

३२. **नितीन सप्रे, योजना मासिक, संपादक राजेशकुमार झा, माहिती व प्रसारण मंत्रालय केंद्र सरकार, डिसेंबर** २०१३ प्रस्तुत निबंधातून भारतातील अन्नसुरक्षा विधेयकाबाबत अनुराधा मोहन यांनी या मासिकात माहिती दिलेली आहे. बालकांचे कुपोषण, बालकांचा जन्मदर, भारतातील विविध राज्यात वाढत जाणारी भूकबळी, संयुक्त राष्ट्रसंघाचा घटक असलेल्या अन्न आणि कृषि संघटनेचा अहवाल व त्याची वैशिष्टये, २००६ च्या जागतिक बँकेचा अहवाल व त्याचे विश्लेषण यामध्ये केलेले आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना का राबवली जाते याचे कारण, योजनेचे कार्य व स्वरुप या संदर्भात स्पष्ट केलेले आहे. सुधारित सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण प्रणाली, निश्चित लाभार्थी सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण

प्रणाली, लाभार्थींचे निकष, दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या व दारिद्र्य रेषेवरील लोकसंख्या, अंत्योदय अन्न योजना, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण प्रणालीतील उणिवा या संदर्भात स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

पात्र लाभार्थींना डावलणे, चूकीच्या माहितीवर आधारित लाभार्थ्यांच्या याद्या तयार करणे, चुकिच्या लोकांना रेशनकार्ड देणे, इ. दोष या संदर्भात स्पष्ट करण्यात आले आहेत. झा आणि रामास्वामी यांच्या संशोधन अहवालानुसार ७१% अन्न–धान्य चोरीला जाते किंवा देखभाली अभावी खराब होते. खेरा यांच्या अभ्यासानुसार अन्न–धान्य वितरण प्रणालीत अनियमितता आहे. फोम झीरो किंवा झीरो हंगर या ब्राझीलच्या कार्यक्रमाचे विश्लेषण या संदर्भात केले आहे. ब्राझीलमध्ये ही योजना कशी राबवली गेली व या योजनेचे फायदे स्पष्ट केले आहेत. योजना यशस्वी होण्यासाठी प्रबळ राजकिय इच्छाशक्ती व अचूक अंमलबजावणी असावी लागते. भारतातील तामिळनाडू व केरळ या राज्यांचे यशस्वी अन्न–धान्य वितरण धोरणांचा आढावा या संदर्भात घेण्यात आला आहे. दोन्ही राज्यांत सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे असलेले व्यापक स्वरुप, त्यांच्या यशस्वी अंमलबजावणीचे महत्त्वाचे कारण या संदर्भात स्पष्ट करण्यात आले आहे. बहुतेक राज्यांमध्ये निम्म्याहून अधिक गरिबांना सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्थेतून अन्न–धान्य मिळत नाही.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून ज्यांना काही प्रमाणात अन्न–धान्य मिळते त्यातील गरीबांना सरासरी दरमहा दरडोई ३ किलोग्रॅम पेक्षाही कमी मिळते अशी निरीक्षणे या लेखात लेखकाने नोंदवलेले आहे. अन्नसुरक्षा विधेयकात ७५% ग्रामीण कुटूंब आणि ५०% शहरी कुटूंब पात्र करण्याचे ध्येय आहे. गरीब नसलेल्या अनेक व्यक्तींचा समावेश यामध्ये करण्यात येत असताना एकही गरीब व्यक्ती वगळली जाणार नाही अशी काळजी घेतली जाणार आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थ्यांची निवड कशी करावी, ही योजना मोठया प्रमाणावर राबवल्याने अन्न–धान्याच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होईल का? उपासमार संपुष्टात येईल का? कुपोषण संपुष्टात येईल का? या बाबींचा आढावा या संदर्भात आहे. अन्नसुरक्षा विधेयक पारित झाल्यानंतर सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे स्वरुप बदलले या बदलाचा आढावा या मासिकातून घेतला आहे. भारतीय लोकांचे गरीबीचे प्रमाण, कुपोषण या योजनेचा झालेला लोकांना फायदा अशा अनेक बाबींचा अभ्यास या मासिकातून केलेला आहे. सैधान्तिक पार्श्वभूमी मांडताना या योजनेत झालेले बदल याचीही नोंद या मासिकाच्या माध्यमातून घेतलेली आहे.

३३. **सी. पी खेर, दारिद्र्याचा अर्थ, दास्ताने रामचंद्र आणि कं. १९९७ –** प्रस्तुत ग्रंथात स्वातंत्र्यापूर्वी भारतातील दारिद्र्याची स्थिती व विश्लेषण या संदर्भात आहे. ग्रामीण आणि शहरी दारिद्रय, स्वस्तधान्य दुकानातून धान्य खरेदी न करण्याची कारणे, दारिद्रय रेषेखालील ग्रामीण लोकांचे राज्यनिहाय स्थान, शहरी लोकांचे स्थान इ. मुद्यांचा समावेश या संदर्भात आहे. संयुक्त राष्ट्रसंघाला १९९५ साली ५० वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने अनेक देशांनी जगात दारिद्रयनिवारण, पूर्ण रोजगार, सामाजिक विकास शिक्षण, आरोग्य, इ. बाबतीत कल्याणकारी योजना चालू केल्या. दुसऱ्या महायुध्दात झालेल्या हानीमुळे दारिद्रय निर्मूलन हा सरकारी धोरणाचा एक भाग बनला. एकंदरीतच दारिद्र्याचा अर्थ या पुस्तकामध्ये भारतीय स्वातंत्र्यापूर्वीची गरीबी, दुष्काळ यामुळे लोकांची झालेली उपासमार, शासनाने राबवलेल्या धोरणांचा सविस्तर आढावा घेतला आहे. प्रस्तुत संशोधन विषयाची सैधान्तिक पार्श्वभूमी स्पष्ट करण्यासाठी या संदर्भ महत्त्वाचा आहे.

३४. **मनोज पाटिल, नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स,** २०१०: प्रस्तुत ग्रंथात लेखकाने भारतात राबविण्यात येत असलेल्या सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण प्रणाली शासनाच्या योजनांतील महत्त्वाची व ग्रामीण गरीब जनतेसाठी उपयोगी आहे असे मत मांडले आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा अभ्यास करताना इतर सामाजिक सुरक्षा संबंधित योजनांचा आढावा घेतला आहे. या सर्व योजनांच्या अंमलबजावणीचे स्वरुप जाणून घेण्यासाठी या संदर्भाचा आढावा घेण्यात आला आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या संबंधित या योजना असल्यामुळे त्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

३५. **मुंबई शिधा वाटप अधिनियम १९४७, व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे – २०१३, १९४७** : प्रस्तुतचा अधिनियम २०१३ एकूण ८ पानांचा हा अधिनियम आहे. या अधिनियमाला गव्हर्नर जनरल यांची अनुमती मिळाल्यानंतर प्रथम मुंबई शासन राजपत्रात दि. १९ जानेवारी १९४८ रोजी प्रसिध्द करण्यात आला. हा अधिनियम संपूर्ण महाराष्ट्र राज्याला मुंबई क्षेत्रासह लागू आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या व्यवस्थापनासंबंधी काही नियम या अधिनियमात आहेत त्या नियमांचा आढावा प्रस्तुत संशोधन विषयासाठी घेण्यात आला आहे.

३६. **प्रा. रामचंद्र महादेव गोखले, भारताचा स्वातंत्र्यपूर्व इतिहास,** १७५० **ते** १९४७, **कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,** १९८० **–** प्रस्तुत अभ्यास भारताचा स्वातंत्र्यपूर्व आर्थिक इतिहास : ब्रिटिश सत्तेची स्थापना

झाली त्या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्टये, खेडेगावाची रचना व अर्थव्यवस्था, अन्न–धान्य पुरवठा व्यवस्था तसेच त्यामध्ये होत गेलेले बदल, शहरांची स्थिती व त्यांची आर्थिक व्यवस्था, व्यापार, शेतीचे स्वरुप, उद्योगधंदे, हस्तव्यवसायांची पिछेहाट, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम, वाढलेली लोकसंख्या, दुष्काळ, अवर्षणे त्यासंबंधातील उपाय या सर्व घटकांचे विश्लेषण या संदर्भात आहे. त्या काळातील दुष्काळांचा परिणाम भारतीय समाजावर कसा झाला, मोठया प्रमाणात उपासमार का झाली? अन्न–धान्याचा तुटवडा का झाला? यासंबधाचे सर्व विश्लेषण या संदर्भात आहे.

३७. **प्रा डॉ. व. गो. नांदेडकर, राजकिय विचार व विचारवंत, डायमंड पब्लिकेशन** २०११: रॉल्सच्या विचारात वितरणात्मक न्यायाला महत्त्वाचे स्थान आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना यशस्वी होण्यासाठी रॉल्सच्या वितरणात्मक न्यायाचे तंतोतंत उपयोजन होणे गरजेचे आहे. समाजातील स्वातंत्र्याचा लाभ सर्वांना कसा होईल आणि प्रत्येकाला अधिकाधिक स्वातंत्र्य कसे उपभोगता येईल त्यासाठी पूर्ण विकसित झालेली स्वातंत्र्यव्यवस्था निर्माण करण्यापेक्षा समाजातील दर्जा आणि स्थान यांमुळे स्वातंत्र्यवाटप वाढेल अशी न्याय रचना करायला पाहिजे असे मत रॉल्स व्यक्त करतो. उत्पन्न मिळकत आणि संपत्तीनिर्मिती यांचे समान वाटप समाजव्यवस्थेत होणे गरजेचे आहे. रॉल्सने समाजवादी तत्वज्ञानाला उदारमतवादी नीतीतत्वाची जोड देण्याचा प्रयत्न केला आहे.

व्यक्तीला मिळणारा सामाजिक न्याय व्यक्तीगत नसून सामाजिक आहे. सामाजिक मालमत्तेचा वापर मुख्यत्वे समाजातील गरिब वर्गासाठी होणे आवश्यक आहे. रॉल्सच्या विचारातील हाच नेमस्त न्याय आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्था ही सामान्य माणसासाठी महत्त्वाची योजना आहे. दुर्बल घटकांचा विकास प्रथम करावा हा न्याय सिधान्त रॉल्सने मांडला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची अंमलबजावणी रॉल्सच्या वितरणात्मक न्याय तत्वानेच व्हायला पाहिजे. प्रस्तुत संशोधन विषयाची सैधान्तिक चौकट स्पष्ट करण्यासाठी या संदर्भाचा उपयोग करण्यात आला आहे.

३८. **मुकुंद महाजन, रा. का. बर्वे, मो. स. भावे, भारताचा आर्थिक इतिहास** १७५० **ते** १९४७ **भाग पहिला, ओरिएंटल लॉगमन प्रकाशन,** १९७७. : प्रस्तुत संशोधन विषय हा अन्न–धान्याशी संबंधित आहे त्यामुळे त्या काळातील अन्न–धान्य उत्पादनाचे प्रमाण, भारतीय शेती, तत्कालिन राज्यकर्त्यांची सामान्य लोकांसाठीच्या योजना या सर्व घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. भारतामध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य

वितरण योजना ही दुसऱ्या महायुध्दाच्या काळात चालू झाली. या योजनेच्या सैधान्तिक पार्श्वभूमी अभ्यासण्यासाठी संबंधित संदर्भाचा आढावा महत्त्वाचा आहे.

३९. **डॉ मधुसूदन साठे, भारताच्या आर्थिक समस्या भाग एक, डायमंड प्रकाशन** : प्रस्तुत अभ्यासातून लेखकाने भारतातील अन्नसमस्येचा सविस्तर आढावा घेतला आहे. अन्न–धान्याचे महत्त्व, स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची अन्नसमस्या, अधिक धान्य पिकवा मोहिम, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे अन्न–धान्य धोरण, दुसऱ्या योजनेतील अन्न–धान्य समस्या, अन्न–धान्य उत्पादन वाढीसाठीच्या समित्या व शिफारशी, शिफारशींचे मूल्यमापन, तिसऱ्या योजनेतील अन्न–धान्य धोरण, १९६६–१९६७ नंतरचे अन्न–धान्य धोरण, धान्याच्या किंमती का वाढल्या तसेच वाढलेल्या किंमतीचे सर्वसामान्य लोकांवर झालेले परिणाम, अन्न–धान्य धोरणाच्या नव्या दिशा, सार्वजनिक वितरणव्यवस्थेत झालेल्या सुधारणा, देशाच्या अन्नधोरणाची झालेली पुर्नमांडणी, एकाधिकार आणि गव्हाची आयात या सर्व महत्त्वाच्या मुद्यांचा आढावा प्रस्तुत संशोधन विषय पूर्ण करण्यासाठी घेतला आहे.

४०. **कै. डॉ. स. श्री. मु. देसाई, डॉ. सौ निर्मल भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन,** २०१४: प्रस्तुत ग्रंथातून स्वातंत्र्या अगोदरच्या काळात भारताची अन्नसमस्या आणि भारताचे अन्नविषयक धोरण, पहिल्या महायुध्दाच्या काळातील अन्नसमस्या, १९४३ ची अन्न–धान्य चौकशी समिति, १९४७ साली नेमलेली अन्न–धान्य धोरण समिती, नियोजनपूर्व काळातील अन्नसमस्या आणि अन्नविषयक धोरण, १९५० ची अन्न–धान्य अधिप्राप्ती समिती, १९५० नंतरच्या काळातील अन्नसमस्या आणि अन्नविषय धोरण, सन १९५६ नंतरच्या काळातील अन्नसमस्या आणि अन्न–धान्य विषयक धोरण, सार्वजनिक कायदा ४८० करार, सन १९५७ ची अन्न–धान्य चौकशी समिती, १९६१ ते १९६६ या काळातील अन्न–धान्य धोरणे व त्याचा चिकित्सक अभ्यास, अन्न–धान्याचा त्या काळातील खाजगी व्यापार, १९७४ पासूनचे अन्नविषयक धोरण, त्या धोरणाचे फायदे व तोटे, भारतातील अन्नसमस्यांची मुख्य कारणे, भारतातील अन्न–धान्य मागणीवर परिणाम करणारे घटक, अन्न–धान्य पुरवठ्याच्या बाजूवर परिणाम घडवून आणणारे घटक, १९७३ चे भारत सरकारचे अन्नविषयक धोरण, अन्नसमस्या सोडविण्यासाठी राबवलेले विविध उपाय या घटकांचा सविस्तर आढावा या संदर्भात आहे.

४१. **प्रा. डॉ स. श्री. मु. देसाई, व प्रा. श. शं. जोशी, भारताचा आर्थिक विकास, लेखन वाचन भांडार, ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे,**

प्रस्तुत अभ्यास स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंतच्या काळातील आर्थिक वाटचालीचे समालोचन, भारताची फाळणी व आर्थिक परिणाम, राष्ट्रीय उत्पन्न, भारतातील वाढलेल्या लोकसंख्येचे दुष्परिणाम, शेतीचे घटलेले उत्पादन व त्याचे परिणाम, आर्थिक विकास व अन्न–धान्याचे उत्पादन, हरीतक्रान्ती व वाढलेले शेती उत्पादन, अन्नसमस्या, अन्न–धान्य चौकशी समिती, भारताचे अन्न महामंडळ, अमेरिका सार्वजनिक कायदा ४८० ची भारतीय लोकांसाठी घेतलेली मदत, भारतातील पंचवार्षिक योजना व त्या काळातील वाढलेले अन्न–धान्याचे उत्पादन, स्वातंत्र्योत्तर काळातील अन्न समस्या, अन्न–धान्याच्या किंमतीवर परिणाम करणारे घटक, अन्न विभाग व त्यांची निर्मिती व अन्नप्रश्न सोडविण्यासाठी राबवलेले दिर्घकालीन उपाय, यांसारख्या महत्त्वाच्या घटकांचे विश्लेषण या संदर्भ ग्रंथात आहे.

४२. **प्रा. के. एच. ठक्कर, अमर्त्य सेन आणि आर्थिक विकासाची वाया घालवलेली** ५० **वर्षे, प्रगती प्रकाशन,** १९६६. : या पुस्तकात भारतात पडलेल्या दुष्काळांची चर्चा करण्यात आली आहे. दारिद्र्याने पीडीत समाजाचे विश्लेषण या संदर्भात केले आहे. भारतात पडलेल्या या भयंकर दुष्काळात अनेक लोक मरण पावले. दुष्काळातून सावरण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या होत्या. त्या योजनांचा एक भाग हा अन्न–धान्याचा पुरवठा आहे. दुष्काळाच्या तीव्रतेमुळेच भारतातील राज्यकर्त्यांना अन्न–धान्य विषयक धोरणे राबवावी लागली. त्या धोरणांचा आढावा या संदर्भ साहित्यात आहे.

## २.३ **गत संशोधनाचा आढावा**

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेबाबत अनेक संशोधकांनी त्यांचे शोधनिबंध प्रसिध्द केलेले आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी या संशोधन विषयांच्या सैधान्तिक चौकटींचा आढावा घेण्यात आला आहे. भारतातील विविध राज्यांमध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची अंमलबजावणी कशाप्रकारे होते, योजनेचे स्वरुप, योजनेच्या अंमलबजावणीतील प्रभावी घटक याबाबत अभ्यास करण्यासाठी व प्रस्तुत

संशोधन विषयाच्या संशोधनाला योग्य दिशा मिळण्यासाठी खालील संशोधकांच्या संशोधन विषयाचा आधार घेण्यात आला आहे.

**४२.१** Mayank Joshipura, __Public Distribution System in India : A study of IT application for distribution system reform'' - 2005 ,

या संशोधन अहवालात भारतातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे मूल्यमापन केले आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना का निर्माण झाली, सुधारित स्वस्तधान्य वितरण योजनेची वैशिष्टये, अन्न–धान्य वाटप करण्याची पध्दती, लक्ष्यित सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची वैशिष्टये या योजनेची मुलभूत तत्वे, गरिबी निश्चित करण्याचे निकष, गरीबीची कारणे, नॅशनल सॅम्पल सर्व्हेमधील काही परिणाम, रेशन दुकानदारांची या योजनेतील भूमिका, धान्याची गळती व कारणे इ. मुद्यांचे विश्लेषण या संशोधन विषयात आहे. शेतीशी संबंधित विमा योजना, अन्न–धान्याच्या अन्न क्रेडिट कार्ड योजना सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील धान्याचे वितरण करण्याच्या विविध राज्यांमधील पध्दती, धान्य साठवणुकिच्या समस्या, भारतीय शेतीमधील उत्पादक क्षमता, विदेशी अन्न–धान्याचा व्यापार, वितरण व त्या संबंधातील घटकांचे विश्लेषण या संशोधन विषयात आहे. भारताच्या सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची सैधान्तिक पार्श्वभूमी, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे स्वरुप संशोधन विषयाची पध्दती अशा आवश्यक घटकांचा आढावा प्रस्तुत संशोधन विषयासाठी घेण्यात आला आहे.

**४२.२** Sujata, Management of Public Distribution System in India With special Reference to Haryana'', महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक, अप्रकाशीत पी.एच.डी. प्रबंध –२०००.: सदरचा संशोधन विषय हा एकूण ६ प्रकरणांचा आहे. या संशोधनात खालील उदिष्टये आहेत.

१. भारताच्या सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्थेची भूमिका हरियाणा राज्याच्या संदर्भात जाणून घेणे.

२. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे मूल्यमापन व विश्लेषण करणे.

३. ग्रामीण व शहरी भागातील लोकांना या योजनेपासून मिळणाऱ्या लाभाची माहिती घेणे.

४. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकारच्या भुमिकेचा अभ्यास करणे.

५. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या माध्यमातून वितरीत होत असलेल्या लाभाचे मूल्यमापन करणे.

६. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत असलेल्या समस्यांचा विचार करुन त्याबाबत उपाय सूचवणे.

७. हरियाणा राज्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य योजनेच्या सर्व अडचणींचा अभ्यास करणे. संबंधित संशोधन विषयात सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना अंमलबजावणी मध्ये स्वस्तधान्य दुकानदारांच्या कार्याचा तसेच लाभार्थ्यांच्या अडचणींचा आढावा घेतला आहे. संबधित संशोधन संदर्भाचा आढावा घेताना संशोधन पध्दतीचा अभ्यास केला आहे, सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानदार, लाभार्थी, प्रशासनातील विविध घटक यांच्या कार्यपध्दतीबाबत आढावा घेतला आहे.

**४२.३.** Shivkumar Swamayya, __Impact of Public Distribution System on Food Seuurity among poor in Karanataka" म्हैसूर विद्यापीठाचा अप्रकाशीत पी.एच.डी. प्रबंध –२००८, सदरचा संशोधन विषय हा एकूण ७ प्रकरणांचा असून संशोधनाची उदिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या सर्व घटकांचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. दारिद्रय रेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेणे.

३. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थ्यांना मिळत असलेल्या लाभांचा आढावा घेणे.

४. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील अन्नसुरक्षा विधेयकाच्या परिणामांचा अभ्यास करणे.

५. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या कार्याचा आढावा घेणे.

संदर्भित संशोधन साहित्याचा आढावा घेताना सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही गरीब लोकांसाठी फार महत्त्वाची आहे असे आढळले. परंतु या योजनेच्या अंमलबजावणीत अनेक अडचणी आहेत. सरकारी योजना या चांगल्या असतात या योजनांचे यश किंवा अपयश योजनेच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. असा निष्कर्ष या संशोधन विषयात मांडण्यात आला आहे.

४२.४**.** A. M. Swaminathan, "Public Distribution System In Tamilnadu: Evaluation of its Impact and Examination of Policy Options"1996, पॉन्डेचरी पॉन्डेचरी विद्यापीठाला सादर केलेला प्रस्तुत प्रबंध एकूण ६ प्रकरणांचा असून तामिळनाडू राज्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण

योजनेतील शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचा अभ्यास केला आहे. तसेच सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला आहे. तामिळनाडू राज्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या उदिष्टांचा अभ्यास करून सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना कार्यक्षम होण्यासाठी या योजनेतील अडचणींवर उपाय सुचवले आहेत.

लाभार्थी, त्यांच्या माहितीचे विश्लेषण, ग्रामीण व शहरी विभागातील लोकांचे सर्वेक्षण व त्यांच्या माहितीचे विश्लेषण, स्वस्तधान्य दुकानदारांच्या कार्यांचे विश्लेषण या सर्व बाबींचा आढावा या संशोधन विषयातून घेण्यात आला आहे.

४२.५ Anand D, "State Response to Food Security : A Study of the Public Distribution System in Anantapur District of Andhra Pradesh'', या हैद्राबाद विद्यापीठाचा अप्रकाशीत प्रबंध– २००८ मध्ये आंध्रप्रदेश राज्याने जनतेच्या उपासमार व अन्न–धान्याचा प्रश्न सोडवण्यासाठी राज्याच्या भूमिकांचा अभ्यास केला आहे. त्याचबरोबर सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेसंबंधी होत असलेल्या राजकारणाचा आढावा घेतला आहे. तसेच ग्रामीण व शहरी कुटुंबांना या योजनेच्या माध्यमातून मिळालेल्या लाभाचा आढावा घेतला असून सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील रेशन धान्य दुकानदारांच्या भूमिकांचा अभ्यास केला आहे.

अन्नसुरक्षा कायद्याची व्याप्ती, जागतिक अन्न–धान्याचे करार, भूकबळी व अन्नसुरक्षा योजनेची गरज, या योजनेशी संबंधित संविधानिक करार, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची वैशिष्टये, आंध्र प्रदेशातील सार्वजनिक वितरण व्यवस्था, भारतीय अन्न महामंडळ, रास्त भाव दुकानांची भूमिका, लक्ष्यित सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना व राजकारण, रेशनकार्डचे प्रकार, अन्न–धान्याची गुणवत्ता व तक्रार निवारण यंत्रणा या सर्व घटकांची माहिती संबंधित संशोधन विषयातून घेण्यात आली आहे.

सदरच्या संशोधन विषयात खालील निष्कर्ष काढण्यात आले आहेत. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनाच फक्त गरीब लोकांची भूक भागवणार नाही तर त्यासाठी इतर योजनांची अंमलबजावणी शासनाने प्रभावीपणे करावी. आर्थिक सुधारणा करणे, दारिद्रय निर्मूलनासाठी विविध कार्यक्रमांची प्रभावी

अंमलबजावणी करणे, आरोग्य विषयक शिक्षण देणे, रोजगाराची साधने निर्माण करणे यांसारख्या धोरणात्मक घटकांचे प्रभावी नियोजन होणे आवश्यक आहे. फक्त राजकारण समोर ठेवून दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना आखू नयेत तर लोककल्याणकारी योजनांचा विचार शासनाने करायला पाहिजे. सरकारचे विविध कार्यक्रम हे गरीबीचे निर्मूलन करण्यासाठी आहेत याप्रकारचे कार्यक्रम म्हणजे लोककल्याणकारी संविधानाचा एक भाग आहे त्यामुळे त्या कार्यक्रमांचा राजकिय फायदा कोणीही घेवू नये असे या संशोधन विषयात सूचवण्यात आले आहे.

४२.५ Kazi Mohmmad Bashir Ahamad, A Study on the Performance of Public Distribution System Under the New Economy Policy", यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा अप्रकाशीत प्रबंध २००३, मध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थी निवडण्याचे निकष, स्वस्तधान्य दुकानदारांना परवाना देण्याच्या अटी, रेशन कार्डचे प्रकार, रेशन धान्य दुकानदारांच्या कार्यपध्दतीचे विश्लेषण, धान्याची खरेदी, धान्याची किंमत ठरविण्याचे धोरण, धान्याचा कोटा, धान्याचा पुरवठा, धान्य साठवण्याचे गोदाम, लाभार्थ्यांच्या अडचणी, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे समाजासाठीचे महत्त्व, शासनाची या योजनेबाबतची उदिष्टे या सर्व बाबींचा आढावा या संशोधन विषयात घेण्यात आला आहे.

संबंधित संशोधन विषयात नोंदवलेली निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही, धान्य साठवणूक करताना धान्य गोदामचालकांकडून धान्याची योग्य काळजी घेतली जात नाही, धान्य वितरणात अनियमितता आहे. संदर्भित संशोधन विषय हा सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेशी संबंधित आहे त्यामुळे या योजनेशी संबंधित सर्व घटकांचा आढावा प्रस्तुत संशोधन विषयासाठी घेण्यात आला आहे.

**२.४ समारोप :** प्रस्तुत संशोधन समस्येशी संबंधित असणाऱ्या संदर्भ साहित्याची माहिती व गत संशोधनाचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. संशोधनाशी संबंधित असलेल्या संकल्पना संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यामुळे स्पष्ट करता आल्या आहेत. मागील झालेल्या संशोधनाची उदिष्टये काय होती व त्यातून कोणते निष्कर्ष सिध्द झाले या बाबतचा आढावा घेतल्यामुळे प्रस्तुत संशोधनातील वेगळेपण सिध्द करता आले आहे.